# दिनांक 06.09.2021 रोजीची लातूर जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठकीचे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक 06.09.2021 रोजी दुपारी 12.00 वाजता मा. श्री. पृथ्वीराज बी. पी., जिल्हाधिकारी, लातूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर तथा सदस्य सचिव निर्यात प्रचालन समिती यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठकीस सुरूवात झाली. मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे सुचनेनुसार DGFT, पुणे यांचे मार्फत तयार करण्यात आलेला निर्यात आराखडा सर्व उपस्थित सदस्यांना देण्यात आला व महाव्यवस्थापक यांनी PPT द्वारे लातूर जिल्हाचा निर्यात आराखडाचे सादरीकरण करण्यात आले.

मागील सभेच्या इतिवृत्तानुसार सर्व मुद्दे निर्यात आराखड्यामध्ये नमुद केल्याचे मा. अध्यक्ष व समिती सद्स्यासमोर सादर केले. सदर आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार लातूर जिल्हाचा निर्यात आराखड्यास मान्यता देण्यात आल्याचे मा. अध्यक्षांनी जाहीर केले व सदर अंतिम आराखडा उद्योग संचालनालय, मुंबई यांना पाठविण्याबाबत सुचित केले.

मा. अध्यक्षांनी जिल्हास्तरावर निर्यात आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निर्यात संबंधी सर्व माहिती स्थानिक उद्योजकांना उपलब्ध करून देण्याबाबत सुचित केले, जिल्हातून थेट निर्यात जास्तीत जास्त व्हावी या करिता प्रयत्न व्हावेत या साठी सर्व उद्योजक, प्रगतीशील शेतकरी व सर्व शासकीय यंत्रणा यांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

बैठकीच्या शेवटी मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानुन बैठक संपन्न झाली.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, लातूर
तथा सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, लातूर

जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, लातूर